**जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत सर्व कार्यालयांमध्ये कागद (पेपर) वापर मर्यादित व दक्षतेने करण्याबाबत...**

**परिपत्रक**

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**सामान्य प्रशासन विभाग-१**
**जा.क्र/साप्रवि-१/रवका/२८७/२०२५**
**अहिल्यानगर दिनांक- २९/०७/२०२५**

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत सर्व विभागप्रमुख, गटविकास अधिकारी, तालुका कार्यालयीन प्रमुख, व इतर सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, प्रशासनामध्ये दररोज मोठ्या प्रमाणावर कागदाचा वापर होत आहे. कागदाची वाढती मागणी ही पर्यावरणीय दृष्टिकोनातून चिंतेची बाब असून, शासकीय खर्चामध्येही अनावश्यक वाढ करते. राज्य शासनाच्या पर्यावरणपूरक व किफायतशीर प्रशासन धोरणानुसार, जिल्हा परिषद प्रशासनाने कागदाच्या वापराबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना तात्काळ अंमलात आणणे अनिवार्य आहे.

**त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देश दिले जात आहेत –**

**१. डिजिटल माध्यमांचा प्राधान्याने वापर करावा**

- सर्व शक्य त्यासाठी कागदाऐवजी ई-मेल, गूगल डॉक्युमेंट्स, पीडीएफ व ई-फाईल प्रणालीचा वापर करावा.
- परिपत्रक, सूचना, अहवाल व माहिती एकमेकांपर्यंत पोहोचवण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करावा.

**२. डबल साईड (दोन्ही बाजूंनी) प्रिंटिंग**

- आवश्यक असल्यास प्रिंट काढताना शक्य असल्यास दोन्ही बाजूंनी (डबल साईड) प्रिंटिंग करावी.
- ड्राफ्ट डॉक्युमेंटसाठी reused पेपरचा वापर करावा.

**३. अनावश्यक प्रिंटिंग टाळावी**

- केवळ अत्यावश्यक बाबतीतच प्रिंटिंग/झेरॉक्स करावी.
- बैठकांमध्ये शक्य असल्यास प्रोजेक्टर/स्लाईड शोद्वारे सादरीकरण करावे.

**४. रफ कागद वापर प्रणाली**

- रद्द झालेल्या किंवा एकाच बाजूला छपाई असलेल्या कागदांचा रफ कामासाठी वापर करावा.
- अशा कागदांसाठी स्वतंत्र बॉक्सची व्यवस्था करावी.

**कार्यालयप्रमुखांची जबाबदारी**

- कार्यालयप्रमुखांनी कागद वापर नियंत्रणाबाबत कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना द्याव्यात.
- डिजिटल प्रणालीची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
- अनावश्यक प्रिंटिंग किंवा दस्तऐवज छपाई आढळल्यास संबंधिताकडून खुलासा मागविण्यात येईल.

कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा अथवा अंमलबजावणीत दिरंगाई आढळल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुद्ध प्रशासनस्तरावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

सदर परिपत्रक अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या https://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असुन त्यांचा सकेतांक क्रमांक 20250729040139 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 06-08-2025 20:54:28

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१.खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद अहिल्यानगर
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व), जिल्हा अहिल्यानगर